# वसई-विरार शहर महानगरपालिका
## कर संकलन विभाग

दि.१३/०९/२०२४

**वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे व त्यांचा लिलाव करण्याची कार्यवाही सुरू**

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व थकीत मालमत्ता धारकांना सूचित करण्यात येते कि ज्या मालमत्ताधारकांनी वर्षानुवर्ष आपल्या मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही. अशा मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कराच्या प्रती प्राप्त होणारी रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे व त्यांचा लिलाव करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांच्या सुचनेनुसार मालमत्ता कर विभागामार्फत प्रभाग समिती निहाय सदरची कारवाई प्रक्रिया करण्यास सुरुवात करण्यात आली असून थकबाकीदारांच्या मालमत्तांवर कार्यवाही करण्यात येणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने वेळोवेळी नागरिकांना विविध सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतु तरीही बऱ्याच थकबाकीदारांनी अजूनही मालमत्ता कर भरणा केलेला नाही. यामुळे महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात नियमानुसार कठोर कारवाई करण्यास सरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांनी वर्षानुवर्षे मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही त्यांना जप्तीपूर्व नोटीसा देण्यात आल्या असून नोटीसा वाटपाचे काम सुरु आहे. यानंतरही कर भरणा न केल्यास अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करून लिलाव करण्यात येईल.

तरी अशा कारवाईला सामोरे जायचे नसेल तर थकीत मालमत्ता धारकांनी आपल्या थकीत मालमत्ता कराचा भरणा तात्काळ करावा असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे थकीत मालमत्ता कर धारकांना करण्यात येत आहे.

**कर संकलन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**